लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com

विवाहविषयक
सातारा, सांगली, कोल्हापूर मधील मागासवर्गीय वधूसाठी मोफत नाव नोंदणी व परित्यक्ता, विधवा महिलांसाठी नाव नोंदणी चालू आहे.
संपर्क : ८६८९९३४९९६

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक ८१ वा | मंगळवार, दि. १५ ऑक्टोबर २०२४ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# आष्टी उपसा सिंचन योजने'साठी मंत्रीमंडळाची 772 कोटींची सुधारित प्रशासकीय मान्यता

## मोहोळ तालुक्यातील 24 तर माढा तालुक्यातील 3 गावातील क्षेत्र सिंचना खाली येणार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील मोहोळसह माढा तालुक्यातील जनतेसाठी अत्यंत महत्वाच्या असणाऱ्या आष्टी उपसा सिंचना योजनेसाठी आजच्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत 772 कोटींच्या सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

या निर्णयामुळे मोहोळ तालुक्यातील अनगरसह 9 गावातील 3 हजार 900 हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकाराने हा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून आमदार यशवंत माने यांच्यासह मोहोळ तालुक्यातील जनतेने अजित पवार यांचे आभार मानले आहेत.


याबाबत अधिक माहिती अशी, सोलापूर जिल्ह्यातील मोहोळसह माढा तालुक्यासाठी महत्वपूर्ण असणाऱ्या आष्टी उपसा सिंचन योजनेमुळे मोहोळ तालुक्यातील 24 तर माढा तालुक्यातील 3



गावातील 12 हजार 900 हेक्टर क्षेत्र सिंचना खाली येणार आहे. या प्रकल्पासाठी आज मंत्रीमंडळाने 722 कोटी 19 लाख रुपयांची सुधारित प्रशासकीय मान्यता दिली. या तृतीय सुप्रमा अहवालामध्ये नव्याने समावेश केलेल्या मोहोळ तालुक्यातील अनगरसह 9 गावांमधील एकूण 3 हजार 900 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. या प्रस्तावित तिसऱ्या टप्प्या अंतर्गत अनगरसह देवडी, वाफळे, खंडोबाचीवाडी, नालबंदवाडी, कोंबडवाडी, कुरणवाडी (अ.), हिवरे, वडाचीवाडी, चिखली या गावांना सिंचनाचा लाभ होणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील मोहोळसह माढा तालुक्यासाठी ही योजना गेमचेंजर ठरणार आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकाराने मंत्रीमंडळाच्या बैठकीत आष्टी उपसा सिंचन योजनेसाठी 722 कोटींची सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली. या निर्णयाबद्दल मोहोळ तालुक्यातील जनतेकडून उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार मानन्यात येत आहेत.

# शाळांतील भरतीची माहिती पोर्टलवर देणे बंधनकारक



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील अनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी भरतीसाठी संस्थांनी वृत्तपत्रांमध्ये दिलेल्या जाहिरातीची प्रत शिक्षण विभागाच्या संकेतस्थळावर अपलोड करणे बंधनकारक आहे. या संदर्भात शिक्षण विभागाने परिपत्रक जारी केले आहे.

परिपत्रकात नमूद केल्यानुसार, अनुदानित शाळांमधील पदांसाठी मंजुरी देण्याबाबत ही महत्त्वाची बाब असणार आहे. त्यामुळे संबंधित शाळा ही माहिती संचालनालयाच्या पोर्टलवर अपलोड करण्यात अयशस्वी ठरल्यास या पदांच्या भरतीसाठी कोणतीही मान्यता शिक्षण विभागातर्फे दिली जाणार नाही. सर्व शासकीय अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि विशेष शाळांना अशा पदांसाठीच्या जाहिरातींची प्रत शिक्षण खात्याच्या संकेतस्थळावर अपलोड करण्याची सूचना शिक्षण संचालक डॉ. शैलेश झिंगडे यांनी केली आहे.

# जानेवारी दरम्यान उजनी धरणातून सुटणार शेतीसाठी पहिले आवर्तन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सध्या उजनी धरण १११ टक्के भरले असून, धरणात १२३ टीएमसी पाणी आहे. ४ ऑगस्टपासून कॅनॉलमधून सोडलेले पाणी आता मंगळवारी (ता. १५) बंद केले जाणार आहे. १५ ऑक्टोबरला धरणात जेवढा साठा असेल, त्या पाण्याचे नियोजन करून आवर्तने निश्चित केली जातात.

ऑक्टोबरअखेर कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत आवर्तनांचा निर्णय होईल, पण १५ डिसेंबरनंतर शेतीसाठी पहिले आवर्तन सोडण्यात येणार आहे. उजनी धरण ओव्हरफ्लो झाल्यानंतर ४ ऑगस्टपासून



कॅनॉलमधून पाणी सोडण्यात आले. याशिवाय दहिगाव, सीना-माढा उपसा सिंचन योजनांमधूनही पाणी सोडण्यास सुरवात झाली. धरणावरील विद्युत प्रकल्पासाठी देखील दररोज १६०० क्यूसेक पाणी सोडण्यात आले. आता केवळ कॅनॉलमधीलच पाणी सुरू असून, तेही आता १५ ऑक्टोबर रोजी बंद केले जाणार आहे.

मागील अडीच महिन्यांपासून धरणातून पाणी सोडण्यात आले असून, समाधानकारक पाऊस झाल्याने ते पाणी नदीच्या दिशेनेच वाहून गेले. आता पावसाळा संपल्याने धरणातून सोडले जाणारे सर्व पाणी बंद केले जाणार आहे. आगामी आठ महिन्यांचे पाण्याचे नियोजन आता कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत होणार आहे. १५ जानेवारीपर्यंत पहिल्या आवर्तनाचा निर्णय होईल. मार्च-एप्रिलमध्ये दुसरे तर आवश्यकतेनुसार मे महिन्यात शेवटचे आवर्तन सोडले जाऊ शकते. त्याचा निर्णय कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत काही दिवसांतच होईल, असे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

# राज्यपाल यांचा 15 ऑक्टोबर रोजी सोलापूर जिल्हा दौरा

**सोलापूर(कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन हे दिनांक 15 ऑक्टोबर 2024 रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. जिल्ह्यातील सर्व उद्योजक, व्यावसायिक, पत्रकार, प्रतिष्ठित व्यक्ती, आजी-माजी खासदार व आ. जिल्ह्यातील सर्व अधिकारी, राजकीय नेते, राजकीय पक्ष, जिल्ह्यातील प्रमुख लोकप्रतिनिधी यांच्याशी शासकीय विश्रामगृह सोलापूर येथे ते संवाद साधणार आहेत. हा दौरा यशस्वी होण्यासाठी सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी परस्परात योग्य समन्वय ठेवावा व दिलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित माननीय राज्यपाल दौऱ्याच्या अनुषंगाने पूर्वतयारी आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, पोलीस उपयुक्त दिपाली काळे, उपजिल्हाधिकारी संतोष कुमार देशमुख, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संजय माळी, कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे, यांत्रिकी विभाग कार्यकारी अभियंता श्रीनिवास गुजरे, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, तहसीलदार श्रीकांत पाटील यांच्यासह अन्य संबंधित विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.



जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की माननीय राज्यपाल महाराष्ट्र राज्य मंगळवार दिनांक 15 ऑक्टोबर 2024 रोजी सकाळी 11 ते दुपारी दोन या कालावधीत सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस विभाग, अन्न औषध विभाग, पुरवठा विभाग, आरोग्य विभाग, महापालिका, जिल्हा परिषद, माहिती विभाग या सर्व विभागांनी त्यांच्यावर सोपवलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडावी. सर्व संबंधित नोडल अधिकारी व कॅम्प अधिकारी यांनी परस्परात समन्वय ठेवून दौरा यशस्वी करावा. नियोजनात कुठेही हलगर्जीपणा करू नये, असे निर्देश त्यांनी दिले.

प्रारंभी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने नियुक्ती केलेले नोडल अधिकारी व कॅम्प अधिकारी यांच्यावर सोपवण्यात आलेल्या जबाबदारीचे वाचन केले व सदरची जबाबदारी अत्यंत चोखपणे पार पाडावी असे त्यांनी सांगितले. तसेच माननीय राज्यपाल दिनांक 15 ऑक्टोबर 2024 रोजी सकाळी 11 वाजता शासकीय विश्रामगृह सोलापूर येथे येतील त्यानंतर सकाळी 11:15 ते 12:50 या कालावधीत जिल्ह्यातील अधिकारी, पालकमंत्री, खासदार, आमदार, राजकीय पक्ष, इंडियन मेडिकल असोसिएशन, लॉयर्स असोसिएशन, चार्टर्ड अकाउंटंट, जिल्ह्यातील उद्योजक, ज्येष्ठ नागरिक, मान्यवर व्यक्ती, एनजीओ, पत्रकार व अन्य यांच्याशी चर्चा करणार आहेत. त्यानंतर दुपारी 1 वाजून 55 मिनिटांनी ते सोलापूर हुन पुढील कार्यक्रमासाठी जाणार आहेत. तरी या कालावधीत सर्व संबंधित यंत्रणांनी अत्यंत दक्ष रहावे, असेही श्रीमती कुंभार यांनी सुचित केले.

# अपहृत मुलीची माहिती मिळाल्यास संपर्क करण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-**सोलापूर तालुका पोलीस ठाणे, ग्रामीण गुरूनानक चौक यांच्या माहिती नुसार दि. 28 एप्रिल 2024 रोजी अल्पवयीन मुलीगी कु. वैष्णवी विकास शिंदे वय 17 वर्षे 9 महिने, राहणार संभाजी नगर , हगलूर ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर येथून दूपारी 01. 00 वा.आसपास या अल्पवयीन मुलीचे अपहरण झाले असून. अपहृत मुलीचे वर्णन -बांधा सडपातळ, रंग गोरा, उंची 6 फूट, शिक्षण 12 वी पास, भाषा मराठी, केस लांब झकाळे असून, अंगात काळी पँट व जांभळ्या रंगाचा टॉप आहे. या बाबत श्री विकास नागनाथ शिंदे, वय 38 राहणार संभाजी नगर , हगलूर ता. उत्तर सोलापूर यांनी फिर्याद दिली आहे. या अपहृत मुलीचा शोध होणे कामी काहि माहिती मिळाल्यास महिला पोलीस उपनिरीक्षक सोलापूर ता. पोलीस (ग्रामीण) गुरूनानक चौक (फोन-0217-2732017) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन महिला पोलीस उपनिरिक्षक एन.एस.गंपले यांनी केले आहे.

# सैनिकी मुलींचे वसतिगृह येथे पहारेकरी या पदासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर यांचे अधिपत्याखालील सैनिकी मुलींचे वसतिगृह, सोलापूर येथे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात एकत्रित मानधनावर पहारेकरी- 01 पद भरावयाचे आहे. पहारेकरी पदाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य देण्यात येईल. मानधन रुपए 20886/- प्रतिमहा असेल. तसेच सदरील पद हे निवासी आहे. पहारेकरी पद हे माजी सैनिक प्रवगार्तून भरावयाची असून सोलापूर जिल्हयातील माजी सैनिक यांनी आपले अर्ज सैनिक सेवेची व इतर शैक्षणिक कागदपत्रासह दिनांक 17 ऑक्टोबर 2024 रोजी प्रत्यक्ष या कार्यालयात सादर करावे व या पदाकरिता त्याच दिवशी मुलाखती घेण्यात येतील. तरी उमेदवारांनी स्वतःची मुळ कागदपत्रे सोबत आणावीत. या पद निवडीसाठी माजी सैनिकांना प्राधान्य देण्यात येईल. माजी सैनिक उपलब्ध न झाल्यास नागरी जीवनातील उमेदवारांचा विचार केला जाईल. तरी सोलापूर जिल्हयातील पात्र व गरजू माजी सैनिकांनी अर्ज करावेत. असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे.

# जिल्हयातील सर्व आस्थापनांनी त्रैमासिक विवरणपत्र ई.आर-1 ऑनलाईन 31 ऑक्टोबर पर्यंत सादर करावे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कौशल्य विकास, राजगार व उद्योजकता कार्यालय यांच्या आवाहना नुसार सेवायोजन कार्यालये (रिक्तपदे अधिसूचित करणेची सक्ती करणारा) कायदा 1959 व त्याखालील 1960 मधील कलम 5(1) (शासकीय आस्थापनांसाठी), 5(2) (खाजगी आस्थापनांसाठी) नुसार, सोलापूर जिल्हयातील सार्वजनिक/खाजगी क्षेत्रातील आस्थापनांनी त्यांचेकडे काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती पुरूष/स्त्री/एकूण (त्रैमासिक विवरणपत्र ई.आर-1) स्थानिक सेवायोजन कार्यालयास ऑनलाईन सादर करणे कायद्याने बंधनकारक आहे. या सेवायोजन क्षेत्र माहितीचा उपयोग हा योजनाबध्द आर्थिक विकासात निरनिराळे प्रकल्प तयार करण्यासाठी व त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी, आवश्यक मनुष्यबळाचा अंदाज घेण्यासाठी होत असतो. अशा प्रकारची प्राप्त होणारी सांख्यिकी माहिती महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालय, नवी दिल्ली यांचे कडे दर तिमाहीस पाठविली जाते.

(पान 2 वर..)



